# पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई

CB 63/2025

## प्रेसनोट

गुन्हे शाखा, नवी मुंबई | दिनांक २०/११/२०२५

**''अंमली पदार्थाचे रॅकेट उध्वस्त, पंजाब कनेक्शन उघड. नवी मुंबई अंमली पदार्थ विरोधी पथकाने केली कारवाई ''**

पोलीस आयुक्त, नवी मुंबई, श्री.मिलिंद भारंबे, पोलीस सह आयुक्त, श्री.संजय येनपुरे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री.दीपक साकोरे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा, श्री.सचिन गुंजाळ यांनी नवी मुंबई नशामुक्त करण्याचे व अंमली पदार्थ सेवन व विक्री करणाऱ्या इसमांविरुध्द कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत.

अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे वपोनि संदीप निगडे यांना त्यांचे गुप्त बातमीदारांमार्फत कोपरी गाव, वाशी, नवी मुंबई येथे अंमली पदार्थाची विक्री होत आहे. मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने वपोनि निगडे व पथकाने दिनांक १९/११/२०२५ रोजी आरोपी नामे विक्रमजितसिंग अमरीकसिंग, वय—३४ वर्षे, सध्या रा.परशुराम पाटील बिल्डींग नंबर १५/३, गावदेवी मंदीराजवळ, कोपरीगाव, वाशी, नवी मुंबई. मुळ रा.मुधल, पो.वेरका, ता.जिल्हा—अमृतसर, राज्य—पंजाब हा राहत असलेल्या ठिकाणी छापा टाकला असता त्याचे ताब्यात बेकायदेशिररित्या विक्रीकरीता ठेवलेला २७१.८ ग्रॅम वजनाचा १,३५,९०,०००/— (एक कोटी पसतीस लाख नव्वद हजार रुपये) किंमतीचा हेरॉईन हा अंमली पदार्थ जप्त केला. त्याचे विरूध्द ए.पी.एम.सी पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि नंबर ६७६/२०२५ गुंगीकारक औषधीद्रव्य आणि मनोव्यापारांवर परिणाम करणारे पदार्थ (एनडीपीएस) अधिनियम १९८५ चे कलम ८(सी), २१(सी) अन्वये गुन्हा दाखल केला.

सदरचा आरोपी हा मुळचा पंजाब येथील रहीवाशी असून तो कोपरीगाव, वाशी येथे भाडयाने रूम घेवून राहत होता. पंजाब येथून आणलेला अंमली पदार्थाचा माल तो नवी मुंबई येथील त्याचे ओळखीच्या लोकांना विक्री करीत होता. सदरची रक्कम गुगल पेव्द्वारे व रोख स्वरूपात स्विकारत होता. सदर आरोपी यास पंजाब येथून अंमली पदार्थाचा माल पुरवठा करणारे मुख्य आरोपी व त्यांच्याकडुन माल विकत घेणारे असे ०७ पाहिजे आरोपी निष्पन्न केले असून त्यांचा पोलीस शोध घेत आहेत. सदर गुन्हयात आरोपी अटक केला असुन त्यांची दिनांक २६/११/२०२५ रोजी पावेतो पोलीस कोठडी मंजुर आहे. गुन्हयाचा पुढील तपास वपोनि संदीप निगडे हे करीत आहेत.

सदरची उल्लेखनीय कामगिरी ही श्रीमती प्रेरणा कटटे, सहाय्यक पोलीस आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा यांच्या मार्गदर्शनाने अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे वपोनि संदीप निगडे, पोहवा/१३७७ रमेश तायडे, पोहवा/१०७१ बनकर, पोहवा/४४६३ दोरे, पोहवा/४४६६ सतिश मेहेतर, पोहवा/४४७६ गणेश पवार, पोना/४४६२ अंकुश म्हात्रे, मपोना/२७९४ हेमांगी पाटील, मपोशि/४४८५ पगारे, पोशि/४७०८ परमेश्वर भाबड (चालक), पोशि/४७६१ पाटील यांनी केली आहे.

★★★★★★★★★★★